# मुंबई विद्यापीठ

**क्रमांक/संलग्नता/आयसीसी/२०१५-१६/२२**

## परिपत्रक:

सर्व संलग्नित / मान्यताप्राप्त कला, वाणिज्य, विज्ञान, तंत्रज्ञान, फाईन आर्टस व विधी शाखेतील महाविद्यालयांचे / संस्थांचे प्राचार्य /संचालक यांना विद्यापीठाचे क्र. Aff./Recog.I/189 of 2008 दिनांक १७ मे २००८ रोजीच्या परिपत्रकानुसार कळविण्यात येते की, वर्ष २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाची वार्षिक संलग्नता फी दिनांक ३१ जानेवारी, २०१६ पर्यंत सर्व संलग्नित महाविद्यालयांनी /संस्थांनी विद्यापीठाकडे जमा करावयाची आहे.

तरी यासंदर्भात सर्व संबंधीतांना सूचीत करण्यात येते की वार्षिक संलग्नता फी बाबतचे शुल्क राष्ट्रीयकृत बॅकेच्या डीमान्ड ड्राफ्ट मार्फत चलन अन्वये विद्यापीठाचे खाते असलेल्या बॅक ऑफ बडोदा (फोर्ट विद्यापीठ शाखा) येथे जमा करावे. तसेच सदर शुल्क भरतांना महाविद्यालयाने मागिल पाच वर्षांच्या वार्षिक संलग्नता शुल्क जमा केल्याची पावती /पुरावा जोडणे बंधनकारक आहे.

जे महाविद्यालय/ संस्था शुल्क भरल्याच्या पावत्या / कागदपत्रे सादर करणार नाहीत त्यांचे शुल्क स्विकारले जाणार नाहित. तसेच जे महाविद्यालय/संस्था वार्षिक संलग्नीकरणाचे शुल्क /फी विद्यापीठाकडे जमा करणार नाहीत. त्यांचे विरूध्द महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ चे तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(डॉ. अनिल पाटील)
संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

मुंबई-४०० ०३२
१२ जानेवारी, २०१६

प्रति

सर्व संलग्नित / मान्यताप्राप्त कला, वाणिज्य, विज्ञान, तंत्रज्ञान व विधी शाखेतील महाविद्यालयांचे / संस्थांचे प्राचार्य /संचालक

प्रत माहितीकरिता व योग्य त्या कार्यवाहीकरिता :-

१. वित्त व लेखा अधिकारी
२. उपकुलसचिव, ( वित्त व लेखा )
३. उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग
४. कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक
५. कुलसिचवांचे स्वीय सहाय्यक